ज्ञान वाचन आंदोलन

बाल पुस्तक माला

आवडणार नाही का तुम्हाला
पुस्तकांचं बोलणं ऐकायला?

पुस्तकांना तुम्हाला काही सांगायचंय
त्यांना तुमच्या जवळ रहायचंय

पुस्तकांमध्ये चिमण्या चिवचिवतात
पुस्तकांमध्ये हिरवी शेतं डुलतात

पुस्तकांत झऱ्यांचं पाणी गुणगुणतं
अन् पऱ्यांच्या कथा कुजबुजतात

पुस्तकांत अग्निबाणाचं रहस्य असतं
पुस्तकांत विज्ञान बोलत असतं

पुस्तकांचं जग केवढंतरी मोठं आहे
पुस्तकांमध्ये ज्ञानाची लयलूट आहे

आवडणार नाही का तुम्हाला
त्या जगात भटकायला?

पुस्तकांना तुम्हाला काही सांगायचंय
त्यांना तुमच्या जवळ रहायचंय

सफदर हाश्मी

भारत ज्ञान विज्ञान समुदाय

मूल्य चार रुपये

रुमालातील ससा

माधवी इनामदार



भारत ज्ञान विज्ञान समुदाय

पुस्तकाचे नाव : रूमालातील ससा
लेखक : माधवी इनामदार
चित्रकार : आनंद नाखरे
संपादन : विनया देशपांडे

जवाआं/२७ (दुसरी आवृत्ती)

प्रकाशन : ६ डिसेंबर, २००२

मूल्य रूपये : ४.००

प्रकाशक : संतोष बी.पी.
राज्य सचिव, भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)
२९१,बापटवाडी,शनिवार पेठ,पुणे-४११०३०
फोन : ०२०-४४३४१३३
मुद्रण स्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,पुणे-४११०३०

अक्षर जुळणी : गणेश कांबळे
मांडणी : दिनानाथ मनोहर

रूमालातील ससा

उन्हाळचाची सुट्टी संपत आली. आता आपण दुसरीत जाणार म्हणून पिंट्या खूष होता. शाळा सुरू होण्याआधी पिंट्या मावशीकडं रहायला गेला होता. मावशी गावातच राहायची. पलीकडच्या भोईआळीत. मावशी अंगणवाडी चालवायची. तिच्याकडं शिलाई यंत्र होतं. मावशीकडं रहायला पिंट्याला खूप आवडायचं. शिलाईयंत्राचा टर्रर्र आवाज ऐकायला त्याला मजा वाटायची. घरभर रंगीबेरंगी कापडाचे चित्रविचित्र आकाराचे तुकडे पसरलेले असायचे. ते घेऊन खेळायला खूप मजा यायची. त्यातून गंमतीशीर आकार तयार करता यायचे.



यावेळी मावशीनं त्याला एक छान भेट दिली होती. तिनं एक रंगीत रूमाल तयार केला होता. त्यावर पांढराशुभ्र, मऊशार कापडाचा एक

ससा शिवला होता. त्याला लाल डोळाही शिवलेला होता. फारच सुंदर रूमाल होता तो. पिंट्या रूमालावर बेहद्द खूष होता. घरी आल्यावर त्यानं तो आधी आईला दाखवला. साऱ्यांनाच तो रूमाल खूप आवडला.

पिंट्या तो रूमाल सारखा खिशात ठेवायचा.

एक दिवस गंमतच झाली. तो एकटाच माळच्यावर बसला होता. समोर रूमाल होता. रूमालावरचा ससा टुणकन् उडी मारून पिंट्यासमोर उभा राहिला. पिंट्या चकीत झाला. मग दोघांनी खूप उड्या मारल्या. दंगामस्ती केली. दोघांची खूप दोस्ती जमली.



थोड्या वेळानं त्याचे मित्रमैत्रिणी घरी आले. पिंट्याकडे एक कापडी चेंडू होता. पूर्वी कधीतरी मावशीनं करून दिलेला. तो घेऊन ते घराबाहेर पडले. मारुतीच्या देवळाच्या पटांगणात पोचले. चपटे दगड गोळा करून लगोरीचा खेळ सुरू झाला. चेंडू फेकून एकमेकाला धोपटणे रंगात आले.

पण काय आश्चर्य! आज पिंट्याला पाठीत चेंडूच बसत नव्हता. पिंट्या सशासारख्या टणाटण उड्या मारत होता. सशासारखा वेगात धावत होता. चेंडूचा मारा चुकवत होता. दुसऱ्याच्या पाठीत चेंडू हाणत होता. पिंट्याबरोबर तो ससा होता ना! खेळून खेळून सगळे खूप दमले. थकून देवळाजवळ येऊन बसले. सगळे घामाघूम झाले होते. पण पिंट्या खूष होता. खेळायला त्याच्याबरोबर ससा असल्यानं वेगळीच धमाल येत होती.

त्यानं खिशातून रुमाल काढला. सगळा घाम पुसला.

तेवढ्यात कुणाला तरी मुंग्यांची एक मोठी रांग दिसली. सगळी पोरंपोरी तिकडं धावली. छोटे छोटे पांढरे कण तोंडात धरून मुंग्या हळूहळू पुढे सरकत होत्या. या मुंग्या कुठं जात असतील बरं... पिंट्याच्या मनात विचार आला.

''या मुंग्या कुठं चालल्यात बघू या का?'' कुणीतरी विचारलं.

''हो'' सगळे एका सुरात जोरात ओरडले. मग ते सगळे हळूहळू निघाले. मुंग्यांच्या रांगेच्या बाजूबाजूने. बसून..खुरडत तर कधी रांगत रांगत. कुणीतरी मधेच विचारलं, ''त्यांच्या तोंडात काय आहे रे?''

''साखर ऽऽ.'' एकदोन पोरं ओरडली.

''रवाऽऽ.'' आणखी एक दोघं ओरडली. रवा की साखर यावरून वाद सुरू झाला.

पप्या म्हणाला, ''आरं त्या मारुतीला निघाल्यात. देवापुढं काय रवा घिऊन जात्यात? साकरच असणार ती.'' सगळी पोरंपोरी

खिदळली.

बारीक नजरेनं बघत सोन्या म्हणाला, "अरं ते साखरेसारखं न्हाई दिसत. नीट बघा. रवाच हाय तो." सगळीजण पुन्हा तावातावानं बोलू लागली.

त्यावर वयानं सगळचात मोठा असलेला चिंत्या ओरडून म्हणाला, "गपा रे. भांडू नका. काही मुंग्या साखर घेऊन चालल्यात तर उरलेल्या रवा. देवळात गेल्यावर त्या शिरा करून नैवेद्य दाखवणार मारुतीला." सगळी पोरं धो धो हसली. हर तच राहिली.




मुंग्या पार देवळाला वळसा घालून पुढं निघाल्या होत्या. पोरं रांगतच होती. शेवटी मुंग्या एका वारूळाजवळ पोचल्या. घाईघाईनं वारूळात शिरू लागल्या. सगळीजणं ती गंमत पहात बसली.

बघता बघता संध्याकाळ कधी झाली कळलंच नाही. अंधार पडायच्या आत परतायला हवं. मग मात्र सगळे उठले. पिंट्यादेखील उठून उभा राहिला. स्वत:कडं त्याची नजर गेली तर काय? हातपाय गुडघ्यावर मातीच माती. कुठं कुठं चिखलही लागलेला. त्यानं पटकन् खिशातून रुमाल काढला. हातपाय पुसून टाकले.

सगळे धावत घरी आले.

घरी आल्यावर पिंट्यानं हातपाय धुतले. तो जेवायला बसला. कडकडून भूक लागली होती. जेवताजेवताच त्याला झोप येत होती. जेवण झाल्याझाल्या तो गुडूप झोपला.

मध्यरात्र झाली तसा ससा पुन्हा बाहेर आला. ससा सारखा म्हणत होता, "पिंटू, उठ ना. बघ, मी किती घाण झालोय. मला आंघोळ




घाल ना. पिंटू....ए पिंटू'' त्यानं पिंटूला खूप हाका मारल्या पण पिंटू इतका गाढ झोपला होता की बस्स! हूं की चूं नाही. शेवटी ससा थकला. पुन्हा जाऊन रुमालावर बसला.

एकदोन दिवस असेच गेले. पिंटूची शाळा सुरू झाली. पिंटू शाळेला निघाला. घंटा वाजू लागली म्हणून पळू लागला. पळता पळत ठेच लागली. तो धप्पकन् पडला. त्याच्या गालाला, हाताला, पायाला, सगळीकडं माती लागली. डोळ्यातदेखील माती उडाली. त्यानं पटकन् खिशातून रुमाल काढला. हातपाय झटकले. डोळे पुसले आणि भरभर तो शाळेत गेला.

दुपारी तो घरी आला. भाकरी खाता खाता तो एकदम थांबला. त्याला त्याच्या दोस्ताची आठवण झाली. खिशात हात घालून त्यानं रूमाल बाहेर काढला.

अरेरे हे काय? रूमालावरचा ससा हिरमुसला होता. त्याचा शुभ्र रंग गायब झाला होता. तो ससा आता मळून गेला होता. त्याच्या



मातकट, मळकट रंगावरून हात फिरवत पिंट्यानं विचारलं, ''ससुल्या तुला काय झालं रे? तू असा का दिसतोस?''

ससा म्हणाला, ''अरे, सगळी घाण तू मला पुसतोस. तुला लागलेली धूळ, माती, चिखल मी माझ्या अंगावर घेतो. मग मी स्वच्छ कसा रहाणार? मला तू स्वच्छ नकोस का करायला? आणि अशा घाणेरड्या रूमालानं तू डोळे पुसतोस. तुझ्या डोळ्यात घाण जाते, जंतू जातात. बघ. जरा आरशात बघ. कसे लाल झालेत तुझे डोळे.''

पिंट्यानं उठून बघितलं. खरंच डोळे लाल झाले होते. चुरचुरत होते.

पिंट्या कबुली देत म्हणाला ''खरंच की रे. आई पण मला नेहमी सांगते. जेवायला बसण्याआधी हातपाय धुवायला. आई फळं,



भाज्यादेखील धुवून घेते. दिवसभर शेताचं, घराचं काम करते. लांबून हंड्याहंड्यानं पाणी भरते. पण कपडे, भांडी सगळं कसं लख्ख ठेवते. मलादेखील सारखी स्वच्छ करत असते. नाही का?''

ससा छानसं हसला. आणि गप्प बसला.

भाकरी संपवून पिंटू उठला. हाताबरोबर डोळे स्वच्छ पाण्याने धुतले. मग तो आईकडं गेला. आईनं स्वच्छ कापडानं त्याचे डोळे टिपले. आता त्याला झोप आली. थोडावेळ झोपून तो उठला तर डोळे चुरचुरायचे थांबले होते. स्वच्छ दिसत होते.

पिंटू तडक मोरीत गेला. खिशातला रूमाल त्यानं ओला केला. साबण लावून घासला. खळखळून स्वच्छ धुतला. सशाची स्वच्छ आंघोळ झाली.

ससा पुन्हा शुभ्र पांढरा झाला. पिंट्या पुन्हा खूष झाला.

आता पिंट्या रोज आपल्या आंघोळीच्या अगोदर सशाला आंघोळ घालतो!

(आधारित)

♦♦♦♦♦♦